# मुंबई विद्यापीठ

क. वि.नि.वि./३१५/ ४०९ /२००८
मुंबई - ४०० ०३२.
६ सप्टेंबर, २००८

परिपत्रक:-

विषय :- विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील (शहरी/ग्रामीण) शिक्षकांना सन २००७-०८ 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार'

मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागाचे संचालक/विभाग प्रमुख आणि सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कमांक वि.नि.वि.वि. दिनांक ३१५/१२२, दिनांक १ एप्रिल २००८ रोजी परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते की सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यापीठ/महाविद्यालीन स्तरावर आदर्श शिक्षकांचा शोध घेउन अशा शिक्षकांना 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात यावे म्हणून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात आले होते.

उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराची निवड करण्यासाठी माननीय कुलगुरूंच्या आदेशानुसार समिती गठीत करण्यात आली होती. विद्यापीठातील विविध विभागाकडून आणि संलग्नित महाविद्यालयाकडून एकून २१ (शहरी/ग्रामीण मिळुन) प्रस्ताव प्राप्त झाले होते. निवडसमितीकडून सर्व प्रस्तावाची छाननी करण्यात आली, तद्नंतर निवड समितीच्या बैठकीत प्रस्तावावर सखोल चर्चा होउन खाली नमुद केलेल्या शिक्षकांची उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

१) **श्री भगवान चक्रदेव**
श्रीमती चांदीबाई मुन्शी हिमंतलाल मनसुखानी महाविद्यालय,
उल्हासनगर, जिल्हा ठाणे.

2) **प्रा. एस.एच. मशरक्वी**
प्राध्यापक रसायन शास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ. साताकुझ (पूर्व), मुंबई ४०० ०९८.

३) **श्री.वसंत सि. शेकडे**
कणकवली महाविद्यालय. कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग.

**'आदर्श शिक्षक पुरस्कार'** प्रदान करण्याचा सोहळा कवीवर्य कुसुमाग्रज मराठी भाषा साहित्य भवन, विद्यानगरी, येथे भारताच्या ६१ व्या स्वांतत्रदिनी म्हणजेच दिनोक १५ ऑगष्ट २००८ रोजी संपन्न झाला, तेव्हा निवड झालेल्या आदर्श शिक्षकाचा मा. कुलगुरूंच्या हस्ते प्रमाणपत्र, मानचिन्ह व रू. ५,०००/- चा (रूपये पाच हजार फक्त) धनादेश, देऊन गौरव करण्यात आला.

विद्यापीठ विभागाचे संचालक/विभाग प्रमुख सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य यांना विनंती करण्यात येते की सदर परिपत्रक हे आपल्या विभागातील/महाविद्यालयातील शिक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

मुंबई ४०० ०३२.
दिनांक ६ सप्टेंबर २००८

कुलसचिव